आजचा शुभ विचार

जे इतिहास विसरतात, ते इतिहास घडवू शकत नाहीत.'इतिहास कधी विसारायचा नसतो. त्यातून अनेक गोष्टी शिकायच्या असतात. ज्या चुका इतिहासात झाल्या त्या पुन्हा होऊ द्यायच्या नसतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com

पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!






मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-07 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thuseday 06 May 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ०७ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ मंगळवार, दि. ०६ मे २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये


## बाबा महाकाल मंदिर परिसरात भीषण आग, प्रशासनाच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



मध्य प्रदेशातील तीर्थ क्षेत्र उज्जैनच्या महाकाल मंदिर परिसरात अचानक मोठी आग लागल्याचे वृत्त आहे. सोमवारी सकाळी 1 2 वाजण्याच्या सुमारास मंदिराच्या शंख द्वारजवळ आगीच्या ज्वाळा दिसून आल्या, आणि काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केले. या घटनेमुळे संपूर्ण मंदिर परिसरात एकच खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. खूप प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात आली. मंदिर परिसरात आग लागल्याची माहिती मिळताच उज्जैनचे जिल्हाधिकारी आणि एसपी देखील घटनास्थळी उपस्थित राहिले. घटनास्थळी मदत आणि बचाव कार्य अजूनही सुरू आहे. मात्र, आतापर्यंत कोणत्याही जीवितहानीबद्दल कोणतीही बातमी नाही.

### प्रदूषण मंडळाचा नियंत्रण कक्ष जळून खाक

मिळालेल्या माहितीनुसार, ज्या परिसरात ही आग लागली, त्या परिसरात प्रदूषण मंडळाचा नियंत्रण कक्ष होता. या आगीत प्रदूषण मंडळाचा नियंत्रण कक्ष पूर्णपणे जळून खाक झाला आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप कळलेले नसले तरी, मिळालेल्या माहितीनुसार आगीचे कारण शॉर्ट सर्किट असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या संदर्भात पोलिस संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत.

## बारावीचा निकाल 91.88 टक्के, महाराष्ट्रातले 13 लाख विद्यार्थी उत्तीर्ण

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ११ फेब्रुवारी ते ११ मार्च दरम्यान २०२५ दरम्यान घेतलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल आज सोमवार ५ मे रोजी सकाळी ११ वाजता जाहीर करण्यात आला. हा निकाल दुपारी १ वाजता मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध झाला आहे. मंडळाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार बारावीला ९१.८८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. परीक्षेसाठी चौदा लाख २७ हजार ०८५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी चौदा लाख सतरा हजार ९६९ जण परीक्षेला बसले होते. परीक्षेला बसलेल्यांपैकी तेरा लाख दोन हजार ८७३ जण उत्तीर्ण झाले. दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्वाधिक उत्तीर्ण विद्यार्थी संख्या कोकणमध्येच आहे. सर्वात कमी उत्तीर्ण विद्यार्थी संख्या लातूर विभागात आहे. कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक ९६.७४ टक्के एवढा लागला तर लातूर विभागाचा निकाल सर्वात कमी ८९.४६ टक्के एवढा लागला. राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या नऊ विभागांतून विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यंदा सहा लाख २५ हजार ९०१ मुली, तर सहा लाख ७६ हजार ९७२ मुलगे बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाले. मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.५८ टक्के, तर मुलांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ८९.५१ टक्के आहे.

### विभागनिहाय निकाल २०२५

कोकण -९६.७४ कोल्हापूर ९३.६४ मुंबई – ९२.९३ संभाजीनगर – ९२.२४ अमरावती – ९१.४३ पुणे -९१.३२ नाशिक -९१.३१ नागपूर – ९०.५२ लातूर – ८९.४६

## भारतीय सैन्याना मोठे यश! पूंछमधील दहशतवाद्यांचे तळ केले उद्ध्वस्त

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



पहलगाम हल्ल्यानंतर दहशतवाद ठेचून काढण्यासाठी जम्मू-काश्मीरमध्ये भारतीय लष्कराने युद्धपातळीवर कारवायांना सुरुवात केली आहे. जम्मू काश्मीरमध्ये लपून बसलेल्या एक एक दहशतवाद्यांना शोधून त्यांना यमसदनी पाठवण्याच्या प्रयत्नांना वेग आला आहे. भारतीय सैन्याने पूंछमध्ये लपून बसलेल्या दहशतवाद्यांवर हल्ला करत, त्यांचे तळ उद्ध्वस्त करण्यात यश मिळवले आहे. जम्मूमधील तुरुंगांवर हल्ला करण्याचा हे दहशतवादी कट रचत होते, असा अंदाज गुप्तचर विभागाने व्यक्त केला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या तपासादरम्यान पूंछमधील सुरनकोट येथे लष्कर आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी संयुक्त कारवाईत दहशतवाद्यांचा एक अड्डा उद्ध्वस्त केला. ज्यामधून पाच सुधारित स्फोटके (IED) आणि दोन वायरलेस सेट जप्त करण्यात आले आहेत. यावेळी अर्धा किलो ते पाच किलोग्रॅम वजनाचे आयईडी, नियंत्रित स्फोटात सुरक्षितपणे नष्ट करण्यात आले, ज्यामुळे सीमावर्ती जिल्ह्यामधील संभाव्य हल्ले प्रभावीपणे रोखण्यात लष्कराला यश आल आहे.

### अतिरेक्यांकडून आयईडी जप्त

जप्त केलेले आयईडी अतिशय हुशारीने लपवण्यात आले होते, त्यातील दोन स्टीलच्या बादल्यांमध्ये आणि तीन टिफिन बॉक्समध्ये लपवण्यात आले होते. घटनास्थळी सापडलेल्या अतिरिक्त वस्तूंमध्ये युरियाचे पाच पॅकेट, पाच लिटरचा गॅस सिलेंडर, एक दुर्बिण, लोकरीच्या टोप्या, ब्लँकेट आणि इतर विविध साहित्यांचा समावेश होता. एका वेगळ्या पण संबंधित घडामोडीत, लष्कर-ए-तोयबाच्या स्लीपर सेलमध्ये सहभागी असल्याचा संशय असलेल्या इम्तियाज अहमदचा देखील मृत्यू झाला आहे. पोलीस कोठडीतून पळून जाण्याच्या प्रयत्नात अहमद वैशो प्रवाहात बुडाल्याचे वृत्त आहे.

## पुतिन यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोन, पहलगाम हल्ल्याचा निषेध करत म्हणाले, “रशियाचा भारताला पूर्ण पाठिंबा

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानविरोधात पाठिंबा मिळवायला सुरुवात केली असून त्यामध्ये आता रशियाचाही समावेश झाला आहे. दहशतवादाविरोधात लढण्यासाठी रशियाने भारताला संपूर्ण पाठिंबा जाहीर केला असून त्यामुळे भारताच्या लढ्याला आता मोठं बळ मिळालं आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोन करुन पहलगाम हल्ल्याचा निषेध नोंदवला. नरेंद्र मोदींना पहलगामनंतर फोन करणारे रशियाचे पुतिन हे १८ वे जागतिक नेते आहेत.

२२ एप्रिलला पहलगाम या ठिकाणी चार दहशतवाद्यांनी निरपराध पर्यटकांवर हल्ला केला. या घटनेत २६ जणांचा मृत्यू झाला. चार दहशतवाद्यांनी धर्म विचारुन लोकांना ठार केलं. २६ पुरुष पर्यटकांना या हल्ल्यात ठार करण्यात आलं. भारतासह संपूर्ण जगाने या घटनेचा निषेध नोंदवला. आता भारताने या प्रकरणी पाकिस्तानला उत्तर द्यावं अशी जनभावना आहे. पहलगाम हल्ल्याला १० दिवसांहून अधिक काळ उलटून गेला आहे. दरम्यान भारताकडून काय उत्तर दिलं जातं याकडे जगाचं लक्ष आहे. A N I च्या वृत्तानुसार व्लादिमिर पुतिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोन करुन पहलगाम हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे. हा हल्ला अत्यंत निंदनीय आहे. भारताने कठोर पावलं उचलावीत आम्ही भारताच्या बाजूने आहोत असं पुतिन यांनी म्हटलं आहे.

### पुतिन यांनी भारताला जाहीर केला पाठिंबा

भारतातील दहशतवादी हल्ल्यामध्ये जे कुणी सामील असतील त्यांना कठोर शिक्षा मिळावी असं मत पुतीन यांनी व्यक्त केलं. दहशतवाद तसेच इतर अनेक गोष्टींवर भारत आणि रशिया एकत्र मिळून काम करतील असा विश्वासही पुतीन यांनी मोदींना दिला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशिचाच्या ८० व्या स्थापना दिवसाच्या पुतीन यांना शुभेच्छा दिल्या. या वर्षाच्या शेवटी भारतात शिखर संमेलन पार पडणार असून त्यासाठी नरेंद्र मोदी यांनी रशियाच्या पुतीन यांना आमंत्रण दिलं आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने रशिया -युक्रेन युद्ध्याच्या पार्श्वभूमीवर वॉरंट जारी केल्यानंतर पहिल्यांदाच पुतिन भारतात येणार आहेत. या आधी भारतात झालेल्या G 2 0 परिषदेला पुतिन अनुपस्थित राहिले होते. नरेंद्र मोदींनी स्वतःच पुतिन यांना भारतात येण्याचे निमंत्रण दिले आहे. दोन दिवसांपूर्वी पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी रशियाकडे मदतीची याचना केली होती. भारताने घेतलेल्या आक्रमक भूमिकेविरोधात पाकिस्तानला पाठिंबा द्यावा अशी मागणी त्यांनी पुतीन यांच्याकडे केली होती. पण रशियाने पाकिस्तानच्या मागणीला कोणतीही भीक घातली नाही. त्याउलट रशियाने भारताच्या भूमिकेला जाहीर पाठिंबा दिला आहे. त्यामुळे पाकिस्तानसमोरील अडचणीत वाढणार हे निश्चित मानलं जातं आहे.

## लाडक्या बहिणीचे पैसे अजित पवार यांनी घरी नेले नाहीत - हसन मुश्रीफ

राजेंद्र यादव
सांगली प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



लाडकी बहीण योजनेसाठी अजित पवार यांनी आभाळातून पैसे आणले पाहिजेत का? त्यांनी हे पैसे घरी नेले नाहीत. याबाबतची वस्तुस्थिती समजून घेऊन संजय शिरसाट यांनी विधान करायला हवे, असा प्रति टोला वैद्यकीय शिक्षण मंत्री हसनमुश्रीफ यांनी येथे लगावला. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी विभागाचा निधी वळवल्याबद्दल वित्त तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा नामोल्लेख न करता टीका केली होती. या संदर्भात पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना मुश्रीफ म्हणाले, शासनातील संबंधित खात्यांचा निधी त्या योजनांसाठी देण्याची पूर्वीपासून पद्धत आहे. आता मागासवर्गीय, आदिवासी विभागाचा निधी त्याच विभागासाठी दिला यात काहीही गैर नाही. याबाबत संजय शिरसाठ यांना काही वावगे वाटले असते तर त्यांनी वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करायला हवी होती. त्यातूनही समाधान झाले नसले तर मुख्यमंत्र्यांशी संवाद साधता आला असता. पण तसे न करता अजित पवार सारख्या सत्तेतीलच एका ज्येष्ठ नेत्यांवर चुकीची उपमा देणे योग्य आहे. अजित पवार यांनी लाडक्या बहिणींसाठी आभाळातून पैसे आणा हवे होते का? त्यांनी या योजनेचे पैसे घरी नेले नाहीत. खरे तर मुख्यमंत्री असतानाएकनाथ शिंदे यांनी लाडकी बहिण योजना जाहीर केली होती. योजना राबवण्याची जबाबदारी महायुतीतील सर्वांची आहे. इतकी मोठी योजना राबवताना दर महिन्याला ओढाताण होत आहे. एप्रिल महिन्याचे पैसे मे महिन्यात द्यावे लागले आहेत. आश्वासन पूर्ण करण्यासाठी सांघिक प्रयत्न हवे असताना कोणीही टीका करणे योग्य नाही, याची जाणीव मुश्रीफ यांनी करून दिली. काँग्रेस पक्ष खाली करण्याची वेळ आली आहे असे विधान भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे. याकडे लक्ष वेधले असता मुश्रीफ म्हणाले, त्यांनी नेमके काय म्हटले हे मला माहित नाही. तथापि राज्यात महायुतीकडे २३७ इतके भक्कम आमदारांचे पाठबळ आहे. विरोधकांकडे आमदारांची संख्या खूप कमी आहे. त्यांच्या आमदारांना विकासाची कामे पूर्ण होणार नाहीत, लोकांना दिलेली आश्वासने तडीस जाणार नाहीत असे वाटत आहे. यातूनच महायुतीमध्ये येण्याची स्पर्धा सुरू झालेली दिसते. संजय गायकवाड यांनी एकनाथ शिंदे हेच महाराष्ट्राच्या मनातले मुख्यमंत्री असल्याचे विधान केले होते. त्यावर मुश्रीफ म्हणाले, त्यांचे ते विधान एका जिल्ह्यापुरते होते असा खुलासा त्यांनीच केला आहे. परंतु महायुतीचे भक्कम पाठबळ असताना लोकांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी लक्ष देणे केंद्रित करणे आवश्यक आहे. अशी विधाने टाळली पाहिजेत.


शतायुषी हो बाळा..

दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

संपादकीय

# युद्ध 'खेळून' पाहिल्यानंतर...

व्हिएतनाम युद्धात अमेरिकेची मानहानी झाली. व्हिएतनाम मोठे नुकसान सोसूनही सावरला. कथानके रचून विजय मिळत नाही, हेही दिसले... थोडेथोडके नाही, ३० लाखांहून अधिक नागरिक मृत्युमुखी... त्याहून कित्येक जणांच्या तनावर आणि मनावर आजही त्या युद्धाचे व्रण... कोट्यवधींच्या वित्तहानीतून अजूनही सावरणे सुरूच... रसायनास्त्रांमुळे लाखो एकर जमीन नासाडलेली... त्यावर पोसलेल्या दोन पिढ्यांमध्ये आजही अनेक कर्करुग्ण आणि व्यंग्यधारी... इतके असूनही एखादा देश त्या गडदपर्वाच्या अंताचे स्मरण विजयोत्सवाने साजरे कसे करू शकतो, हा प्रश्न व्हिएतनामबाहेरच्या कुणाला पडेल. पण परवाच्या बुधवारी- ३० एप्रिल रोजी- व्हिएतनामची राजधानी हो चि मिन्ह सिटी (पूर्वीचे सायगाव) येथे जंगी संचलने झाली. तीत व्हिएतनामी फौजांच्या बरोबरीने चिनी तुकड्यांनीही भाग घेतला. अर्धशतकापूर्वी म्हणजे ३० एप्रिल १९७५ रोजी तत्कालीन सायगावमधून अमेरिकी सैनिकांच्या शेवटच्या तुकडीने मायदेशी उड्डाण केले होते. व्हिएतनाम युद्धाने त्याच नावाच्या देशाला ठळक अस्तित्व प्रदान केले. हे युद्ध अमेरिकेच्या इतिहासावरचा मोठाच डाग, कारण २० वर्षे झुंजूनही ५८ हजार सैनिक-निमसैनिक गमावण्याची मानहानी इतर कोणत्या युद्धात अमेरिकेने अनुभवलेली नाही. पण इतिहास किंवा आकडेवारीपलीकडे व्हिएतनाम युद्धाच्या परिणामांचा विचार करावा लागेल. तो परिणाम अमेरिकेच्या जनमानसावर झाला. त्या देशातील नागरिकांचा युद्धाकडे, सरकारकडे, माध्यमांकडे पाहण्याचा दृष्टिकोनच कायमस्वरूपी बदलला. आजच्या काळात कथानक किंवा नॅरेटिव्ह हा शब्द परवलीचा आहे. असे नॅरेटिव्ह दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभी नाझी जर्मनीच्या गोबेल्सने वापरले आणि जनमानसाचा लोंढा पाहिजे तसा आणि तिथे वळवला. नॅरेटिव्हचा त्याच प्रकारे पण वेगळ्या रूपात स्वहितसंवर्धनासाठी वापर व्हिएतनाम युद्धात केला गेला. त्या वेळचे सरकार युद्धाबद्दल काहीही सांगायचे, तेच माध्यमे जनतेपर्यंत पोहोचवायची आणि जनता ते खरे मानून घ्यायची. या भाबड्या फुग्याला पहिली टाचणी १९६०च्या दशकात लागली आणि युद्धाची धग व्हिएतनाम किंवा आग्नेय आशियाच नव्हे, तर अमेरिकेलाही कवटाळू लागली. त्यातून शहाणे होऊन सावरण्यापूर्वी किमान ५८ हजार अमेरिकनांना प्राणाहुती द्यावी लागली. तब्बल चार वेगवेगळ्या अध्यक्षांनी व्हिएतनाम युद्धाच्या काळात अमेरिकेचे धोरण ठरवले होते. ड्वाइट आयसेनहॉवर, जॉन एफ. केनेडी, लिंडन जॉन्सन आणि रिचर्ड निक्सन. या कोणालाही विजयाची खात्री नव्हती. पण कम्युनिस्टांना बडवण्याची संधी सोडून माघार घेणे प्रत्येक अध्यक्षासाठी राजकीयदृष्ट्या अप्रतिष्ठेचे आणि जोखमीचे ठरणार होते. निर्णयक्षमतेबाबत कधी गोंधळ आणि कधी खोटेपणा यांचा आधार अमेरिकी नेतृत्वाने घेतला याचे कारण शत्रू नेमका कोण याविषयी संदिग्धता होती. व्हिएतनामच्या उत्तर भागाचे नेते हो चि मिन्ह आणि त्यांची व्हिएतकाँग ही बंडखोर संघटना हे लक्ष्य असावे, तर इतक्या फुटकळ शत्रूसाठी अर्धी पृथ्वी ओलांडून प्रथम सल्लागार आणि नंतर सैनिक पाठवण्याची गरज नव्हती. पण फ्रेंच इंडोचायना म्हणजे व्हिएतनाम, कम्बोडिया, लाओस तसेच तत्कालीन बर्मा अर्थात म्यानमार या विशाल टापूमध्ये सोव्हिएत रशिया आणि चीन यांच्या साम्यवादी हस्तकांनी हातपाय पसरणे आरंभले होते. मुळात इंडोचायना ही फ्रेंच वसाहत. दुसऱ्या महायुद्धात नाझी जर्मनीने फ्रान्सचा पाडाव केला, ती संधी साधून जपानने इंडोचायनातूनही फ्रेंचांना हुसकावून लावले. परंतु जर्मनी आणि पाठोपाठ जपानचाही पाडाव झाल्यानंतर फ्रान्ससारख्या वसाहतवादी देशाने पुन्हा इंडोचायनावर हक्क सांगणे अन्याय्य होते. पण तसे त्यांनी केले आणि त्यांस अमेरिकेचे समर्थन मिळाले. यातूनच व्हिएतनाम युद्धाची बीजे पेरली गेली. हो चि मिन्ह यांच्या लोकप्रियतेच्या आसपासही अमेरिका आणि फ्रान्सच्या हातचे बाहुले ठरलेले न्गो दीन दिएम हे पोहोचू शकत नव्हते. पहिल्या इंडोचायना युद्धसमाप्तीनंतर व्हिएतनामचे उत्तर आणि दक्षिण भागांमध्ये विभाजन झाले. तेव्हाच्या तहानुसार निवडणूक घेऊन दोन्ही देशांचे एकत्रीकरण अपेक्षित होते. पण पराभवाच्या भीतीने न्गो दीन दिएम यांनी निवडणूक घेतलीच नाही. त्यांनी अमेरिकेच्या मदतीने हो चि मिन्ह यांचा प्रतिकार करण्याचे पाऊल उचलले. तत्कालीन सोव्हिएत रशिया आणि चीनने हो चि मिन्ह यांना पैसा आणि सामग्री पुरवली. मात्र थेट युद्धात सहभागी होण्याची चूक टाळली. अमेरिकेने सुरुवातीस वित्तपुरवठा, सामग्री आणि सल्लागार धाडण्याचा निर्णय घेतला. पण युद्ध पुढे सरकू लागले, तसे म्हणजे १९६०च्या मध्यावर सैनिक धाडण्याचा निर्णय घेतला. या आत्मघातकी निर्णयापर्यंत अमेरिका कशी पोहोचली? अमेरिकेने १९५०च्या मध्यावर व्हिएतनाममध्ये सक्रिय लक्ष घालण्यास सुरुवात केली, तो काळ अमेरिकनांच्या दृष्टीने वेगळ्याच आत्मविश्वासाचा होता. महायुद्धात मोठ्या भावाची भूमिका घेऊन मिळवलेले विजय, तुलनेने कमी मनुष्यहानी, दुसऱ्या महायुद्धाच्या निमित्ताने लष्करी उद्योग उभारणीतून मिळालेले यश, अण्वस्त्रनिर्मितीत इतर देशांच्या तुलनेत घेतलेली आघाडी आणि कोणत्याही परिस्थितीत आपण अजेय आणि मूल्यरक्षकच असल्याचा समज अमेरिकेच्या निर्णयामागे होता. प्रेसिडेंट आयसेनहॉवर हे स्वत: यशस्वी लष्करी जनरल. शिवाय जगाला आता साम्यवादाचा धोका असून, नाझीवादाप्रमाणेच साम्यवाद संपवण्याची किंवा किमान रोखण्याची जबाबदारी अमेरिकाप्रणीत युरोपीय देशांचीच आहे असा समज तेथे पद्धतशीरपणे करून दिला गेला. पण व्हिएतनामी राष्ट्र आकांक्षा, गनिमी युद्धतंत्र, सोव्हिएत रशियाकडून व्हिएतकाँगला मिळालेली मदत या घटकांकडे अमेरिकी शासकांचे पूर्ण दुर्लक्ष झाले. उत्तर व्हिएतनामचा प्रतिकार वाढू लागला, तसा तो दडपण्यासाठी वेगवेगळ्या तीव्रतेने युद्धात उतरण्याची गरज अमेरिकेला वाटू लागली. दुसऱ्या महायुद्धातील लढाईचे तंत्र कालबाह्य ठरले, पुरेशी भौगोलिक माहिती न घेता झालेल्या कारवाया आत्मघातकी ठरू लागल्या आणि बघता बघता व्हिएतनामच्या- पर्यायाने साम्यवादाच्या- पाडावाचे स्वप्न निसटू लागले. त्या वेळी मुख्य प्रवाहातील माध्यमांनीही अमेरिकेच्या जनतेची दिशाभूल केली. दुसऱ्या महायुद्धापर्यंत सरकारच्या निर्णयावर विश्वास ठेवणारी अमेरिकी जनता व्हिएतनाम युद्धाच्या उत्तरार्धात अधिकाधिक संशयी आणि हताश होऊ लागली. व्हिएतनामला धाडण्यासाठी १९६५ मध्ये घराघरांतून सैनिकभरती होऊ लागली, तेव्हा भयंकराची आणि सैनिकांपेक्षा अधिक शवपेट्याच मायदेशी परततील याची भयाण जाणीव अमेरिकनांना झाली. व्हिएतनाम युद्ध अमेरिकेच्या नेत्यांनी प्रतिष्ठेचे बनवले. त्यासाठी माध्यमांना हाताशी धरले गेले. रानटी शत्रूला चिरडण्यासाठी आपल्याकडे पुरेशी अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आहेत. काही दिवसांचाच हा खेळ असे सातत्याने सांगितले, रेटले गेले. असंघटित, बरेचसे खेडवळ परंतु प्रखर राष्ट्राभिमानी अशा व्हिएतनामींविरोधात अमेरिकेची प्रशिक्षित फौज ठायीठायी पराभूत होत होती. प्रचंड बॉम्बफेक, 'एजंट ऑरेंज'सारख्या विषारी तणनाशकाची अनिर्बंध फवारणी अशा उपायांनी व्हिएतनामचे लाखो नागरिक मरण पावले, जायबंदी झाले. पण व्हिएतनामचा पाडाव झाला नाही. हा 'खेळ' अमेरिकेच्या माघारीने १९७५ मध्ये संपला, त्या वेळी अमेरिकेच्या मानसिकतेत आमूलाग्र बदल झालेला होता.

# देगलूर येथील स्मशानभूमीत दिपोत्सव साजरा

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------

येथील स्मशानभूमीत १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त रोजी सर्व प्रथम भारत मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिपक प्रज्वलित करण्यात येऊन एकआगळावेगळा कार्यक्रम "दिपोत्सव" जागर स्वच्छतेचा सामाजिक संघटनेच्या वतीने साजरा करुन मृतात्म्यास शांती लाभावी म्हणून २ मिनिटे



शांतता पाळुन भावपूर्ण श्रद्धांजली आदरांजली विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी उपजिल्हाधिकारी मा श्री अनुप पाटील साहेब, तहसीलदार मा श्री भरत सुर्यवंशी साहेब , पोलिस निरीक्षक मा श्री मारोतराव मुंढे साहेब शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, माजी नगरसेवक मा श्री वाय.जी. सोनकांबळे सर युवा सेना पदाधिकारी मा श्री राहुलजी सोनकांबळे, मा.कैलास येसगे कावळगावकर सामाजिक कार्यकर्ते मा संतोष उनगृतवार, कु.भावनाताई नंदकिशोर दाशेटवार आदीसह पुरुष महीला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी मा श्री सत्यनारायण नागोरी, मा श्री सत्यनारायण सुवर्णकार, मा श्री विजय यन्नावार आदींनी परिश्रम घेतले.

# नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय छडवेल कोर्डे येथे चावडी वाचन व गणन कार्यक्रम संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



दि.1मे 2025 वार-गुरूवार रोजी नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय छडवेल कोर्डे येथे इयत्ता 5 वी च्या विद्यार्थ्यांचा चावडी वाचन व गणन कार्यक्रम ग्राम पंचायत कोर्डे येथे राबविण्यात आला*.प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य मा. रावसाहेब संजयकुमार पाटील यांनी पालकांना व विद्यार्थांना निपुण महाराष्ट्र अभियान बद्दल सर्व ग्रामस्थांना माहिती देऊन विद्यालयामार्फत सर्व ग्रामस्थ व पालक यांचे स्वागत केले. प्रसंगी ग्रामपंचायत कोर्डे येथील नागरिक श्री.विजय भदाणे, श्री. शरद पाटील, श्री सुनील चव्हाण श्री संजय वेंडाईत श्री नत्थु वेंडाईत श्रीमती सुरेखाबाई शांताराम भदाणे श्रीमती सीमा दीपक अहिरे श्रीमती ललिताबाई आबा सोनवणे विद्यालयाचे पर्यवेक्षक दादासाहेब रघुनाथ नागरे विद्यालयाचे शिक्षक श्री. सुनील जगताप श्री. श्यामनंदन सोनवणे श्री.राकेश सूर्यवंशी हरकलाल पवार काशिनाथ गांगुर्डे श्रीमती ज्योती सूर्यवंशी सर्व शिक्षक बंधू - भगिनी व विद्यार्थी उपस्थित होते.प्रसंगी इ. 5 वी च्या विद्यार्थ्यांनी ग्रामस्थ व पालक यांच्यासमोर वाचन व गणिती क्रिया याद्वारे विविध उदाहरणे सोडविली .

# साक्री तालुक्यातील लघडवाळ आणि शिवाजीनगरच्या माता-भगिनींचा आक्रोश! दारु आणि जुगाराच्या विळख्यातून गावाला सोडवण्याची पोलीस प्रशासना कडे मागणी !

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------





तालुक्यातील लघडवाळ आणि शिवाजीनगर... दोन गावं, पण व्यथा एकच ! गेल्या काही वर्षांपासून या गावांतील पुरुष मंडळी दारू आणि जुगाराच्या दलदलीत रुतली आहेत. घरात कर्ता पुरुष असूनही संसाराची गाडी रुतली आहे, मुलांच्या स्वप्नांवर पाणी फिरत आहे. या विदारक दृश्यांनी लघडवाळ आणि शिवाजीनगरमधील माता-भगिनींच्या काळजाचा थरकाप उडाला आहे. आता या अन्याय आणि हतबलतेच्या विरोधात या रणरागिणींनी एल्गार पुकारला आहे! आपल्या डोळ्यादेखत आपल्या नवऱ्याला, मुलाला व्यसनाच्या आहारी जाताना पाहणे... रोज घरात होणारे भांडण-तंटे, पैशांची होणारी बरबादी... या असह्य वेदनेतून मार्ग काढण्यासाठी लघडवाळ ग्रामपंचायतीच्या बचत गटातील महिला आणि दोन्ही गावांतील समस्त ग्रामस्थ १ मे २०२५ रोजी एकत्र आले. त्या बैठकीत घुसमटलेल्या भावनांचा बांध फुटला. आता पुरे ! या दारू आणि जुगाराच्या राक्षसाला आपल्या गावातून हद्दपार करायचाच, असा निर्धार या माता-भगिनींनी केला. या दृढ निश्चयाने, लघडवाळ आणि शिवाजीनगरमधील महिलांनी आपल्या व्यथा आणि अपेक्षांचे निवेदन साक्री पोलीस स्टेशनला सादर केले. त्यांच्या डोळ्यात आपल्या संसाराला वाचवण्याची कळकळ होती, तर वाणीत आपल्या गावाला या विळख्यातून सोडवण्याची आर्त हाक ! त्यांनी सांगितले की, गेल्या चार-पाच वर्षांपासून दोन्ही गावांमध्ये खुलेआम दारू विकली जात आहे आणि जुगाराचे अड्डे चालवले जात आहेत. यामुळे गावातील पुरुष केवळ शारीरिक आणि मानसिकरित्या खचले नाहीत, तर अनेक निष्पाप बालकांचे भविष्य अंधारात आले आहे. आता या माता-भगिनींनी कठोर भूमिका घेतली आहे. यापुढे जर कोणी त्यांच्या गावात दारू विकताना किंवा जुगार खेळताना आढळल्यास, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे. आपल्या संसारासाठी पेटून उठलेल्या या महिलांच्या एकजुटीपुढे आता अवैध धंदे चालवणारे किती काळ तग धरतील, हाच प्रश्न आहे. साक्री पोलीस या माता-भगिनींच्या भावनांची कदर करून तातडीने कारवाई करतील, अशी अपेक्षा लघडवाळ आणि शिवाजी नगरमधील प्रत्येक स्त्री आणि पुरुषाला आहे. कारण, आता केवळ काही घरांचा नाही, तर संपूर्ण गावाच्या भविष्याचा प्रश्न आहे ! या महिलांच्या संघर्षाला नक्कीच यश मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांना आहे.

# सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन

## एनव्हीजन-२०२५ चे ९ मे २०२५ रोजी आयोजन

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------

१२ वीचा निकाल काही दिवसांत अपेक्षित आहे. निकालानंतर करियर कसे निवडावे तसेच १२ वीनंतर आपण शिकत असलेल्या विद्याशाखेतील विविध करियर वाटांची ओळख व्हावी यासाठी सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर यांच्या वतीने दि. ९ जून २०२५ रोजी सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर येथे एनव्हीजन-२०२५ या मार्गदर्शक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

१२ वी नंतरच्या विविध शैक्षणिक उपक्रमांसंदर्भात या मेळाव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येईल. विविध क्षेत्रातील अनुभवी करियर कौन्सिलर्स या मेळाव्यात विद्यार्थ्यांचे कौन्सिलिंग करतील. या मेळाव्यात मुंबई विद्यापीठाशी संलग्नित विविध अभ्यासक्रमाशी संबंधित प्रवेश प्रक्रियेबाबत दिवसभर मार्गदर्शन करतील. तसेच महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांची व शिक्षणेतर उपक्रमांची माहिती असलेली शैक्षणिक प्रदर्शन विद्यार्थी व पालकांना पाहता येईल. याशिवाय महाविद्यालयातील विविध विभागांचे स्टॉल्सही करियर मेळाव्यात असतील. सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण सावे, महाविद्यालयातील माजी विद्यार्थी, मुंबई विद्यापीठाचे अधिकारी समुपदेशनासाठी उपलब्ध असतील. या मेळाव्याला स.१० ते सायं. ४ या वेळेत भेट देता येईल. यामध्ये सर्वांना प्रवेश विनामूल्य आहे. अधिक माहितीसाठी ७९७२५४७४९७ (उपप्राचार्य प्रा. महेश देशमुख), ९९६९४११७०१ (उपप्राचार्य प्रा. डॉ. तानाजी पोळ) या क्रमांकावर संपर्क साधावा. या करिअर मार्गदर्शनाचा सगळ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष सी.ए. सचिन कोरे यांनी केले. त्याचप्रमाणे दि. ९ मे रोजी खालील प्रमाणे करियर तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात येणार आहेत.

**परिसंवाद : ९ मे २०२५ (शुक्रवार)**

सकाळी १० वा.: उद्‌घाटन व १२ वी नंतर करियर कसे निवडावे व करियरचे विविध पर्याय.

**समांतर व्याख्याने-**

**सकाळी ११.३० वा. :** विज्ञान शाखेतील करियर्स

**सकाळी ११.३० वा. :** वाणिज्य शाखेतील करियर्स

**सकाळी ११.३० वा. :** कला शाखेतील करियर्स

**दुपारी १२.३० वा. :** विविध विभागांचे स्टॉल्सला भेटी व वैयक्तिक मार्गदर्शन

**दुपारी १.३० वा. :** मुंबई विद्यापीठाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसंबंधी मार्गदर्शन

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जंयती उत्सव निमित्त ३१ मे २०२५ रोजी शासकीय सुट्टी जाहीर करावी, किरण भैय्या पाकळे यांची मुख्यमंत्र्यांना पत्रा द्वारे मागणी...!

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------

ओम साई राम ग्रुप संघटनेचे अध्यक्ष किरण भैय्या यांनी मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या कडे पत्राद्वारे, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३१ मे २०२५ रोजी ३०० वा जन्मोत्सव साजरा करत आहोत, राजमाता पुण्यश्लोक



अहिल्यादेवी होळकर यांनी भारत भरातील अनेक हिंदू मंदिराचे निर्माण केले व प्रसिद्ध हिंदू मंदिराचे जिर्णोद्धार केले व जनतेला रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण



!! ओम साई राम !! !! आई सामकुंजी !!
ओम साई राम ग्रुप संघटना
शैक्षणिक सामाजिक व अन्यायाविरुद्ध लढणारी संघटना
विद्यार्थी व गरीब कष्टकरी जनतेच्या हक्कासाठी
अध्यक्ष:-किरण प्रशांत पाकळे ९८८१९२६९८५

दिनांक:-०२/०५/२०२५

प्रती
मा.श्री.देवेंद्र फडणवीस साहेब
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य

विषय:-राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती उत्सव निमित्त ३१ मे २०२५ रोजी शासकीय सुट्टी जाहीर करणे बाबत...!

महोदय
वरील विषयावरुन मी आपणास नम्र विनंती करतो की राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३१ मे २०२५ रोजी ३०० वा जन्मोत्सव साजरा करत आहोत, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी भारत भरातील अनेक हिंदू मंदिरांचे निर्माण केले व प्रसिद्ध हिंदू मंदिरांचे जिर्णोद्धार केले एवढेच नव्हे तर लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखले, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मोत्सवा निमित्त ३१ मे २०२५ रोजी शासकीय सुट्टी जाहीर करावी अशी मागणी महाराष्ट्रातील तमाम धनगर समाजाचे वतीने आपणास नम्र विनंती करतो...!

आपलाच विश्वासु
किरण भैय्या पाकळे
अध्यक्ष:-ओम साई राम ग्रुप संघटना

आखले, अशा या राजमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मोत्सव निमित्त ३१ मे २०२५ रोजी शासकीय सुट्टी जाहीर करावी अशी मागणी महाराष्ट्रातील तमाम धनगर समाजाचे वतिने आपणास नम्र विनंती करतो

**आपलाच**
**किरण भैय्या पाकळे**
**अध्यक्ष**
**ओम साई राम ग्रुप संघटना**

# दहिवेल पोलीस दूरक्षेत्र येथे दारुबंदीसाठी रणरागिणींनी पुकारला एल्गार...

## साक्री पोलीस ठाणे अंतर्गत अवैध धंद्यांचा महापूर सुरु पोलीस प्रशासन हसे खोरीच्या गुंगीत मग्न..!

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------

साक्री तालुक्यातील लघडवाळ आणि छत्रपती शिवाजी महाराज नगर दोन गावं, पण व्यथा एकच ! गेल्या काही वर्षापासून या गावांतील पुरुष मंडळी दारू आणि जुगाराच्या दलदलीत रुतली आहेत. घरात कर्ता पुरुष असूनही संसाराची गाडी रुतली आहे, मुलांच्या स्वप्नांवर पाणी फिरत आहे. या विदारक दृश्यांनी लघडवाळ आणि छत्रपती शिवाजी महाराज नगरमधील माता-भगिनींच्या काळजाचा थरकाप उडाला आहे. आता या अन्याय आणि हतबलतेच्या विरोधात या रणरागिणींनी एल्गार पुकारला आहे ! आपल्या डोळ्यादेखत आपल्या नवऱ्याला, मुलाला व्यसनाच्या आहारी जाताना पाहणे... रोज घरात होणारे भांडण-तंटे, पैशांची होणारी बरबादी... या असह्य वेदनेतून मार्ग काढण्यासाठी लघडवाळ ग्रामपंचायतीच्या बचत गटातील महिला आणि







लघडवाळ व छत्रपती शिवाजी महाराज नगर या दोन्ही गावांतील ग्रामस्थ १ मे २०२५ रोजी एकत्र आले. त्या बैठकीत महिलांनी या दारू आणि जुगाराच्या डावाला आपल्या गावातून हद्दपार करायचे, असा निर्धार या माता-भगिनींनी केला आहे, या संदर्भात पोलिसांना निवेदन देत दारूबंदीची मागणी केली आहे. लघडवाळ आणि छत्रपती शिवाजी महाराज नगरमधील महिलांनी आपल्या व्यथा आणि अपेक्षांचे निवेदन साक्री पोलिस स्टेशनला सादर केले. त्यांच्या डोळ्यात आपल्या संसाराला वाचवण्याची कळकळ होती, तर बोलण्यात गावाला या विळख्यातून सोडविण्याची आर्त हाक! त्यांनी सांगितले की, गेल्या चार-पाच वर्षापासून दोन्ही गावांमध्ये खुलेआम दारू विकली जात आहे, आणि जुगाराचे अड्डे चालवले जात आहेत.

यामुळे गावातील पुरुष केवळ शारीरिक आणि मानसिकरीत्या खचले नाहीत, तर अनेक निष्पाप बालकांचे भविष्य अंधारात आले आहे. महिलांनी कठोर भूमिका घेतली आहे. यापुढे कोणी त्यांच्या गावात दारू विकताना किंवा जुगार खेळताना आढळल्यास, त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे. कारवाई करण्याची गरज आहे.

**ठोस कारवाईची अपेक्षा**

आपल्या संसारासाठी पेटून उठलेल्या या महिलांच्या एकजुटीपुढे आता अवैध धंदे चालवणारे किती काळ तग धरतील, हाच प्रश्न आहे. साक्री पोलिस या महिलांच्या भावनांची कदर करून तातडीने कारवाई करतील, अशी अपेक्षा लघडवाळ आणि शिवाजी नगरमधील महिलांना आहे. आता संपूर्ण गावाच्या भविष्याचा प्रश्न आहे! या महिलांच्या संघर्षाला दारूबंदीचा निर्णय घेतला जाईल का? दहिवेल पोलीस दूरक्षेत्र चे पोलीस कर्मचारी श्री अहिरे यांना निवेदन देण्यात आले. जुगार व दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे असा विश्वास ग्रामस्थांना आहे.

# साक्री तालुका योग शिक्षक संघाच्या अध्यक्ष पदी कल्पना नंदन तर महासचिव पदी प्रा. शिवप्रसाद शेवाळे यांची निवड

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------

पिंपळनेर सन २०२५-२६ या वर्षाची साक्री तालुका कार्यकारणी धुळे जिल्हा अध्यक्षा मनिषा चौधरी यांच्या आदेशान्वये व जिल्हा कार्यकारणी महीला प्रकोष्ट प्रमुख वैशाली कोरडे जिल्हा निरीक्षक यांच्या उपस्थितीत गठीत करण्यात आली. या कार्यकारणी च्या अध्यक्ष पदी योग शिक्षीका सौ.कल्पना नितीन नंदन यांची व महासचिव पदी प्रा शिवप्रसाद लीलाबाई साहेबराव शेवाळे यांची निवड करण्यात आली



उर्वरीत कार्यकारणी पुढील प्रमाणे गठीत करण्यात आली. कार्यकारणी १/४/२०२५ते ३१/३/२०२६ पर्यंत

**अध्यक्ष-**
सौ. कल्पना नितिन नंदन
**उपाध्यक्ष**



१)श्रीमती मनिषा शांताराम अहिरराव
२) प्रा डॉ. एस एस भोई
**महासचिव-**
प्रा. शिवप्रसाद लीलाबाई साहेबराव शेवाळे
**कोषाध्यक्ष**
लक्ष्मी कटारिया
**सचिव-**
१) श्रीमती मनिषा युवराज बोरसे
२) रिटा बोदाणी
**सह सचिव -**
१) प्रीती पोपळी
२) चित्रा रत्नानी
**संघटन सचिव-**
१) दिलीप विक्रम बोरसे
२) सुवर्णा संभाजी शिंदे
३) स्मिता शिंदे
**मिडीया प्रभारी-**
पाच्या देहल्या गावित
**सोशल मीडिया प्रभारी-**
राजेंद्र एखंडे
**महीला प्रकोष्ट प्रभारी-**
१) विद्या दिलीप बोरसे २) प्रतिभा योगेश्वर नांद्रे
३) कल्पना शिवप्रसाद शेवाळे

# नांदगाव तालूक्यातील परधाडी येथे महावितरणचे उपकेंद्र सबस्टेशनच्या कामाचे भूमिपूजन संपन्न

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

नांदगाव तालुक्यातील परधाडी येथे महावितरण उपकेंद्र मंजूर करण्यात आले असून याचे भूमिपूजन माजी आ. अनिल आहेर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. याप्रसंगी आ.सुहास कांदे व सौ. अंजुमताई कांदे उपस्थित होते. यावेळी परधाडी ग्रामपंचायत तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने आ. सुहास कांदे यांचा राज्यमंत्री दर्जा मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तर परधाडी ग्रामपंचायत महिला सरपंच व सदस्यांनी सौ अंजुमताई सुहास कांदे यांचा सत्कार केला. यावेळी बोलताना अनिल आहेर यांनी आ. सुहास कांदे यांनी आपल्या कार्याच्या जोरावर मतदार



संघातील जनमानसात स्वतःची जागा निर्माण केली आहे. विधानसभा निवडणुकीत परधाडी व परिसरातील गावातील लोकांनी भरभरून मते दिल्याची परतफेड म्हणून शेतकरी बांधवांना उपयोगी ठरेल अशा या सबस्टेशनच्या कामाचे भूमिपूजन होत असल्याचे सांगितले. पुढे बोलताना परधाडी व परिसरातील गावांच्या विविध प्रलंबित समस्या आपण लवकरच सोडवाल अशी आशा व्यक्त केली. आ.सुहास कांदे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना दादांनी माझ्यावर विश्वास ठेवून निवडणुकीत माझ्या पाठीशी राहिले हे मी शेवटपर्यंत विसरणार नाही यापुढे आपण जो आदेश कराल त्या आदेशाचे पालन केले जाईल असा शब्द दिला. लवकरच न्यायडोंगरी येथे सौर ऊर्जा प्लांट निर्माण होऊन या पंचक्रोशीतील नागरिकांना दिवसा वीज मिळेल आणि शेतकरी बांधवांच्या हाल अपेष्टा दूर होतील असेही सांगितले. परधाडी येथे निर्माण होत असलेल्या उपकेंद्र सब स्टेशन मुळे न्यायडोगरीच्या मोठा लोड कमी होईल आणि परधाडी व पंचक्रोशीतील गावातील शेतकरी बांधवांना सुरळीत वीज पुरवठा होणार आहे .याप्रसंगी स्टेजवर माजी सभापती विलास भाऊ आहेर शिवसेना तालुकाप्रमुख साईनाथ गिडगे बाजार समितीचे सभापती दर्शन आहेत किरण भाऊ कांदे ' प्रमोद भाबड ' अमोल नावंदर 'अनिल वाघ ' जीवन गरुड 'गोरख सरोदे ' हरेश्वर सुर्वे ' ठेकेदार समाधान पाटील बाळासाहेब आव्हाड माजी नगराध्यक्ष योगेश पाटील' गोकुळ कोठारी 'पिंटू शिरसाट 'शिवाजी बापू बच्छाव 'अँड किरण गायकवाड 'उदय आप्पा पवार, माया गायकवाड 'सुरेखा पवार ' सरला पवार ' आशाबाई साबळे ' शारदा बागुल, आदि सह पंचक्रोशीतील गावातील नागरिक शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

# नांदगाव शहरातील स्मशान भूमीत पैशाच्या पाऊसासाठी मांडली पूजा; पैशाचा पाऊस न पडल्याने मांत्रीकाचे अपहरण

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------

पैशाचा पाऊस पाडून देणाऱ्या बाबांशी त्यांनी डील केली, ठरलेल्या वेळेनुसार, ठरलेल्या ठिकाणी बाबांकडून पैशांचा पाऊस पाडण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र पैशांचा पाऊस न पडल्याने निराशा झाली..मग आता करायचे काय म्हणून गुन्हेगारी प्रवृत्ती असलेल्या त्यांनी त्या बाबाचेच अपहरण केले..एखाद्या चित्रपटाला साजेशी घटना नांदगाव शहर व परिसरात घडली..या घटनेशी निगडीत असलेला खंडणीचा गुन्हा चाळीसगाव पोलिसांत दाखल करण्यात आला असून घटनेच्या मुळाशी पोहोचत स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव व नांदगाव पोलिसांनी संयुक्तिक कारवाई करत आरोपींना गजाआड केले..याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, चोऱ्या - माऱ्या, रस्त्यात नागरिकांना अडवून त्यांच्याकडून पैसे, सोने हिसकावणे, मारहाण आदी गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीतील जयेश दत्तात्रय शिंदे ( वय २८ ) रा.सैनिक कॉलनी, चाळीसगाव ( जिल्हा जळगाव ) श्रावण पुंडलिक बागोरे , रा.स्वामी विवेकानंद नगर , नांदगाव ( जि.नाशिक ) जनार्दन उर्फ राजू बाळू आवारे, मुंबई, सोनू, मुंबई ( पूर्ण नाव गाव माहित नाही. ) या ' चार ' गुन्हेगारांनी झटपट श्रीमंत होण्यासाठी पैशांचा पाऊस पाडणाऱ्या चाळीसगाव येथील गणेश ताराचंद राठोड, रा.वाघले ( ता.चाळीसगाव ) येथील पैशांचा पाऊस पाडून देणाऱ्या



या बाबाशी संपर्क केला..बाबाने पाऊस पाडण्याच्या बदल्यात एक विशिष्ट रक्कम घेतली.. त्यानुसार नांदगाव येथील स्मशानभूमीत मध्यरात्री पाऊस पाडायचे ठरले.. ठरलेल्या वेळेत मध्यरात्री वेगवगेळ्या वाहनातून ' त्या ' बाबासह हे चार जण स्मशानभूमीत दाखल झाले..पैशांचा पाऊस पाडण्यासाठी पूजा मांडली गेली, पूजा झाली अन् पैशांचा पाऊस पाडण्याचा खेळ सुरू झाला..मात्र प्रयोग सपशेल फसला ; प्रयत्न करूनही पैशांचा पाऊस पडलाच नाही.. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या त्या ' चार ' जणांनी बाबाकडे दिलेल्या पैशांची मागणी केली मात्र बाबाने पैसे देण्यास नकार दिला..यावरून बाबाला धडा शिकवायचा म्हणून या गुन्हेगारांनी बाबाचे अपहरण केल्याचा बनाव रचला अन् बाबाच्या मुलाकडे ४५ लाख रुपयांची मागणी केली.. यामध्ये बाबाला मारहाण करण्याचा व्हिडिओ व्हॉट्स अप या सोशल मीडियाद्वारे देखील पाठवण्यात आला..व पैसे घेऊन नांदगावला ये असे सांगितले..पैसे आणून न दिल्यास बाबाला मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली..एवढे पैसे कुठून आणायचे म्हणून डॉक्टर असलेल्या मुलाने पोलिसात धाव घेत घडत असलेला प्रकार जळगाव पोलिसांच्या कानावर घातला.. जळगाव स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवायला सुरुवात केली..दूरध्वनीद्वारे नांदगावशी संबंध आल्याने त्यांनी पोलिस निरीक्षक प्रीतम चौधरी व पोलिस उपनिरीक्षक संतोष बहाकर यांच्यासह नांदगाव पोलिसांची मदत घेतली..अन् तपासाची चक्रे फिरू लागली..ज्या नंबरवरून अपहरण झाल्याबाबत कॉल गेला त्या नंबरचे लोकेशन आणि कॉल डिटेल्स तपासले गेले..त्यानुसार जळगाव स्थानिक गुन्हे शाखा व नांदगाव पोलिसांनी अधिकारी व कर्मचारी अशा १८ लोकांच्या वेगवगेळ्या टीम तयार करत सापळा रचला..मोबाईल लोकेशन मांडवड शिवार दाखवत असल्याने पोलिसांनी तिकडे धाव घेतली..मांडवड शिवारात ' त्या ' गुन्हेगारांना पकडण्यासाठी फिल्डिंग लावण्यात आली...त्या चार जणांपैकी दोघे जण एका कारसह मांडवड शिवारातील एका शेतात लपून बसलेले होते..तर अपहरण केलेला बाबाला घेऊन इतर दोघे जण हे विंचूर - लासलगाव मार्गावरील जंगलात गेले..तिथे त्यांनी बाबाचे हातपाय बांधून मारहाण करत तिकडेच टाकून दिले.. पोलिसांनी मांडवड शिवारातून दोघांना एका कारसह ताब्यात घेत पोलिसी खाक्या दाखवला असता त्यांनी बाबाला लासलगाव शिवारात घेऊन गेल्याचे सांगितले..पोलिसांनी आपला मोर्चा लासलगाव शिवाराकडे वळवला..विंचूर लासलगाव परिसरातील त्या जंगलाचा शोध घेतला असता त्या बाबाला हातपाय बांधून मारहाण करीत बेशुद्धावस्थेत तिथेच सोडून पोलिस येत असल्याची खबर मिळाल्याने बाबासोबत असलेल्या तिघांनी तेथून मुंबईच्या दिशेने पळ काढला.. पोलिसांनी बाबाचा मागोवा घेत त्यास शोधले व अपहरण नाट्यातून त्याची सोडवणूक केली..एकूणच एखाद्या चित्रपटाला साजेशी घटना घडली अन् स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव व नांदगाव पोलिसांच्या कर्तबगारीने एका दिवसांत गुन्ह्याची उकल करण्यात आली..या घटनेबाबत दोघा संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून चाळीसगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे..जळगाव येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक शेखर डोमाळे, हवालदार मुरलीधर धनगर, संदीप पाटील, पोलिस शिपाई महेश पाटील, जितू पाटील, ईश्वर पाटील, भूषण शेलार, सागर पाटील, भूषण पाटील चालक दीपक चौधरी आदींसह नांदगाव पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक प्रीतम चौधरी, पोलिस उपनिरीक्षक संतोष बहाकर आदींसह पोलिस शिपाई सरदारसिंह मेहेरे, दत्ता सोनवणे आदींचा या कारवाई पथकात समावेश होता..

# सामाजिक परिवर्तनाचे अहिंसात्मक माध्यम म्हणजे लोकशाही.- डॉ. सुधीर गव्हाणे
## ( कै.नारायणराव चिद्रावार स्मृती व्याख्यानमालेत प्रतिपादन)

नांदेड जिल्हा प्रतिनिधी
मनोज बिरादार
दैनिक स्वराज्यदुत
------------------------

कोणत्याही रक्तपाताशिवाय सामाजिक व आर्थिक परिवर्तन घडविण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे लोकशाही आहे. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारतीय संविधानाच्या माध्यमातून लोकशाहीचा पाया मजबूत आणि भक्कम करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पूर्ण झाले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी या देशांमध्ये एकूण ६४८ संस्थानिक होते ते कधीच एकत्र नव्हते परंतु या सर्व संस्थानिकांना एकत्रित करण्याचे काम भारतीय लोकशाहीने केले आहे. लोकशाहीमुळेच भारतातील प्रत्येक नागरिकाला आर्थिक सामाजिक , राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक असे मूलभूत हक्क प्राप्त झाले असून प्रत्येकाला दर्जाची व संधीची समानता भारतीय संविधान व लोकशाहीने प्राप्त करून दिलेली आहे. त्यासाठी लोकशाही हेच समाज परिवर्तनाचे एकमेव व अत्यंत प्रभावी व रक्तविरहित माध्यम आहे. आज भारतीय समाजव्यवस्थेमध्ये सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत आणि देशाची विविध क्षेत्रांमध्ये प्रगती होत आहे हेच लोकशाहीचे फलित आहे.महिला, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक, अस्पृश्य असे सर्व जाती व धर्मातील लोकांना





समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम लोकशाहीने केलेले आहे. भारतातील लोकशाही वाचली तरच आपण वाचू , समाज वाचेल यासाठी लोकशाही मूल्यांची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन जेष्ठ विचारवंत व य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिकचे माजी कुलगुरु डॉ. सुधीर गव्हाणे यांनी केले. ते कै. नारायणराव चिद्रावार स्मृती व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून ३९ वे पुष्प गुंफताना बोलत होते. या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी देगलूर बिलोली- मतदार संघाचे आमदार जितेश अंतापुरकर होते. तर व्यासपीठावर नांदेड लोकसभा मतदार संघाचे खासदार प्रा. रवींद्र पा. चव्हाण, अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पा. बेम्बरेकर व डॉ.किरण चिद्रावार हे होते. प्रारंभी कै.नारायणराव चिद्रावार यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून व्याख्यानमालेस प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकपर भाषणातून किरण चिद्रावार यांनी कै.नारायणराव चिद्रावार यांच्या जीवनावर व देगलूर शहरात केलेल्या विविध विकास कामावर प्रकाश टाकला. या प्रसंगी खासदार प्रा. रवींद्र चव्हाण यांनी कै. बळवंतराव पा. चव्हाण व कै. कै.नारायणराव चिद्रावार यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबध होते तसेच कै. वसंतराव चव्हाण यांचेही चिद्रावार परिवाराशी आपुलकीचे व कौटुंबिक संबंध होते. चिद्रावार परिवारातील एकूण तीन पिढ्यापासून नायगांवच्या चव्हाण परिवाराचा संबंध आहे. या परिवाराने देगलूरच्या सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक , संस्कृतीक व अध्यात्मिक विकासात मोलाचे योगदान दिले आहे व आजही नारायणराव चिद्रावार यांच्या स्मृति प्रीत्यर्थ मोफत शस्त्रक्रिया शिबीर घेवून गरीब व उपेक्षित लोकांची सेवा करण्याचे महत्वपूर्ण कार्य विशेष नोंद घेण्यासारखे आहे. असे गौरोद्गार त्यांनी काढले. तर अध्यक्षीय सामारोपातून आमदार जितेश अंतापुरकर यांनी चिद्रावार व्याख्यानमाला ही मागील ३९ वर्षापासून सुरु आहे ही देगलूरच्या वैचारिक क्षेत्रातील उल्लेखनीय बाब आहे, डॉ.रवींद्र चिद्रावार , डॉ. किरण चिद्रावार व परिवाराने अशीच सामाजिक बांधिलकी जपावी व देगलूरच्या सर्वांगीण विकासात योगदान द्यावे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागप्रमुख प्रा.डॉ.बी.आर. कतुरवार यांनी केले तर हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष येरावार यांनी आभार मानले. प्रारंभी प्रा. गौतम भालेकर व प्रकाश सोनकांबळे यांनी स्वागत गीताने मान्यवरांचे स्वागत केले तर प्रा.डॉ. सर्जेराव रणखांब यांनी पाहुण्याचा परिचय करुण दिला. कार्यक्रमास अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष विलास तोटावार, कार्यकारिणी सदस्य सुर्यकांत नारलावार , देवेंद्र मोतेवार , रवींद्र अप्पा द्याडे , चंद्रकांत नारलावार , डॉ.रवींद्र चिद्रावार, श्री प्रकाश चिद्रावार श्री अरुण चीद्रावार, गुरुराज चीद्रावार, डॉ. अनिल चिद्रावार अड् मोहसीन आली , माजी नगराध्यक्ष लक्ष्मीकांत पद्मवार व नंदकुमार दाशेटवार ,डॉ. जनार्धन भूमे, डॉ. विनायक मुंडे, डॉ. शेख मुजीब, डॉ. लाडके, बसवराज पाटील नागराळकर , साईनाथ मेढेवार , कैलास येसगे , उमेश पाटील झरीकर , वाय. जी. सोनकांबळे , यांच्यासह बहुसंख्य नागरिक उपस्थित होते

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# नांदेड जिल्ह्यासाठी गौरवाची बाब! संतोष पाटील यांची 'राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघ' जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------



नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायक अशी बातमी समोर आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामविकास आणि पंचायत राज व्यवस्थेला दिशा देणारे एक प्रभावी नेतृत्व म्हणून ओळख असलेले सरपंच संतोष पाटील यांची 'राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघ, नवी दिल्ली' यांच्या वतीने नांदेड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सरपंच संतोष पाटील यांनी आजवर ग्रामविकासासाठी झपाटून काम करत स्थानिक पातळीवर सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. त्यांच्या अभ्यासपूर्ण दृष्टिकोनामुळे आणि लोकसहभाग वाढविणाऱ्या कार्यपद्धतीमुळे त्यांनी पंचायतीच्या विकासाला एक नवी दिशा दिली आहे. ही नियुक्ती ही केवळ त्यांच्यासाठीच नाही, तर संपूर्ण नांदेड जिल्ह्यासाठी एक सन्मानाची आणि प्रेरणादायक बाब ठरली आहे. त्यांच्या नेतृत्त्वाखाली संघटना अधिक सक्रिय, सक्षम आणि परिणामकारक होईल, असा विश्वास संघटनेच्या राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या नियुक्तीबाबत राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रमोद सांगोले, राज्य प्रभारी सुनिल पाटील, सह-प्रभारी रवी पाटील, महासचिव प्रा. नितीन ताथोड, कार्याध्यक्ष प्रा. अरुण देवडे, संघटक रमेश गडदे, महिला विभाग प्रमुख सौ. सुनिता सुतार, तसेच इतर मान्यवर पदाधिकाऱ्यांनी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. संतोष पाटील यांनी या नियुक्तीमागील विश्वासाला न्याय देत, " संघटनेच्या धोरणानुसार पारदर्शकता, इमानदारी आणि निस्वार्थ भावनेने कार्य करत, नांदेड जिल्ह्याचा विकास आणि पंचायत राज व्यवस्थेचा सशक्तीकरण हाच माझा मुख्य उद्देश राहील," असे ठामपणे सांगितले. या नियुक्तीमुळे नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना नवे बळ, दिशा आणि गतिशील नेतृत्व मिळाल्याची भावना जिल्हाभरातून व्यक्त होत आहे.

# संयुक्त जयंती महोत्सव निमित्त होम मिनिस्टर कार्यक्रम

राजाराम सोनकांबळे
हडपसर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



हडपसर १५ नं. येथे महापुरुषांच्या संयुक्त जयंती निमित्त होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन .व लकी ड्रॉ चे वाटप करण्यात आले. महिला आघाडी अध्यक्ष आर .पी .आय मिनाज ताई मेहमान यांच्या नेतृत्वाखाली भव्य होम मिनिस्टर कार्यक्रम व शक्ती प्रदर्शन करण्यात आले. त्यावेळी उपस्थित महिला आघाडी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शशिकलाताई वाघमारे , चंद्रकांता ताई सोनकांबळे , महादेव धंदी, हडपसर अध्यक्ष आरपीआय महादेव कांबळे ,पुणे जिल्हा उपाध्यक्ष संतोष खरात ,पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष कामगार आघाडी रामभाऊ कर्वे .असंख्य महिला पदाधिकारी व महाराष्ट्र बांधकाम माथाडी कामगार व जनरल कामगार संघटना हडपसर अध्यक्ष राजुभाऊ रावणगांवकर सामाजिक कार्यकर्ते शिवसेना पदाधिकारी राष्ट्रवादी सर्व पदाधिकारी सर्वांनी उपस्थित राहून होम मिनिस्टर या कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद दिला. त्यावेळेस महिला आघाडी अध्यक्ष शशिकलाताई वाघमारे यांनी एका प्रकारे इशाराच दिला आहे. कोणाच्याही नादी लागा. पण " आर.पी.आय.च्या मादी लागू नका" असा खणखणीत विसरला आहे. त्यामुळे सर्वांच्या भवया उंचावले आहेत.

# "आधार फाउंडेशन"च्या गेट टुगेदरने निर्माण केली नवचैतन्याची लाट

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------





"आधार फाउंडेशन"च्या वतीने सदस्यांचा गेट टुगेदर कार्यक्रम १२ वर्षांनी मालेगाव येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात संस्थेचे सर्व सदस्य, युवा कृषी पदविकाधारक, मार्गदर्शक मंडळी आणि मान्यवर उपस्थित होते.संस्थेचे सर्व सदस्य कृषि तंत्र विद्यालय मालेगाव कॅम्प येथील कृषी पदविकाधारक असून, ग्रामीण भागातील शेतीविषयक नवकल्पना आणि युवा नेतृत्व यावर विशेष भर दिला गेला. कार्यक्रमात संस्थापकांच्या हस्ते नवे उपक्रम आणि योजनेची माहितीही देण्यात आली.कृषि तंत्र विद्यालतील माजी विद्यार्थीनीं स्पर्धा परीक्षेची पुस्तके देण्यात भेट देण्यात आली. या आधी सर्व सदस्यांनी कोल्हापूर पूरग्रस्त, रायगड जिल्ह्यातील वाकळे शाळेतील मुलांना शालीय वस्तू , गरजू युवा शेतकरी यांना बियाणे खरेदी, गुणवंत विद्यार्थीना सत्कार असे अनेक कार्यक्रम आधार फाऊंडेशन मार्फत उपक्रम राबविले आहे. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. संस्थेच्या दिवंगत सदस्यांना श्रदांजली वाहण्यात आली त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष स्वप्नील हिरे यांनी उपस्थितांचे स्वागत करत "आधार फाउंडेशन"च्या वाटचालीचा आढावा सांगितला. या कार्यक्रमाला चंद्रशेखर खैरनार, वैभव भामरे, निलेश येवले, ऋषीकेश शिरसाठ, कृष्णा पाटील सदस्यांनी आपले अनुभव सांगितले. स्नेह संमेलन सदस्यांमध्ये एक वेगळी ऊर्जा जाणवली. शेती क्षेत्रातील नवकल्पना, स्टार्टअप्स, व तंत्रज्ञान यावर भर देत काही महत्त्वाचे उपक्रमही या वेळी जाहीर करण्यात आले.या गेट टुगेदरमुळे सदस्यांमध्ये सुसंवाद वाढला असून, संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचा भाग अधिक मजबूत झाला आहे. कार्यक्रमाचे आयोजन सुयोजितरीत्या करण्यात आले असून सर्वांनी समाधान व्यक्त केले. अभिषेक कांगणे, दिनेश चव्हाण, किरण पाटील, मंगेश पवार, तुषार खैरनार शुभम हिरे इतर सदस्य कार्यक्रमाला उपस्थित होते,

या कार्यक्रमाला कृषि तंत्र विद्यालचे प्राचार्य हेमंत जाधव यांनी माजी विद्यार्थीनेचे कौतुक केले. गिरीष मोरे, संपत गवळी, योगेश दासनूर मार्गदर्शक मंडळी या कार्यक्रमाला उपस्थिती होती. सूत्रसंचालन व आभार तुषार ह्याळीज यांनी केले

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# दरेवाडी शाळेत गुणवंत विद्यार्थी व शिक्षक यांचा गौरव सोहळा संपन्न

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



इगतपुरी तालुक्याच्या अतिदुर्गम भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दरेवाडी येथे नुकताच गुणवंत विद्यार्थी व शिक्षक यांचा गौरव सोहळा संपन्न झाला. अध्यक्षस्थानी प्रयोगशील शिक्षक डॉ. श्रीनिवास पोतदार होते. प्रस्तुत सोहळयत सन २०२४-२५ अंतर्गत शाळेतील विविध उपक्रम व स्पर्धा यांमध्ये सुयश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.यांमध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र शासनाच्या विनोबा शैक्षणिक प्रतिष्ठान मार्फत घेण्यात आलेली स्पेलिंग बी स्पर्धा, साई कला आविष्कार पुणे मार्फत आयोजित राज्यस्तरीय चित्ररंगभरण स्पर्धा, जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धा यांतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक व मेडल देवून गौरविण्यात आले. तसेच भोसला मिलिटरी स्कूल नाशिक येथे पुढील मोफत शिक्षणासाठी निवड झालेली इयत्ता पाचवीची विद्यार्थीनी पल्लवी गावंडा हिचा सुद्धा विशेष गौरव करण्यात आला. या स्नेहमयी सोहळयतच इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप व सदिच्छा समारंभ घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून घोटी येथील पवन वुमेन्स हाॅस्पिटलच्या संचालिका डॉ.रूपाली चौरे उपस्थित होत्या. त्यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या व लेखन साहित्य भेट दिले. या निमित्ताने दरेवाडी तथा भामनगर ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीकडून शाळेतील गुणवंत शिक्षिका श्रीमती वंदना सोनार तसेच महेश खैरनार व मुख्याध्यापक संजय गातवे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. दरेवाडी शाळेच्या प्रेरणादायी उपक्रमाबद्दल इगतपुरी पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी निलेश पाटील, विस्तार अधिकारी किशोर सोनवणे व काळुस्ते केंद्रप्रमुख विजय पगारे यांनी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# कल्याण मध्ये अंमली पदार्थांची तस्करी

जयवंत डगळे
कल्याण शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

कल्याण जवळील आंबिवली इराणी वस्तीमध्ये राहत असलेल्या एका इराणी महिलेला मेफोड्रेन या अंमली पदार्थांची तस्करी करताना खडकपाडा पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने बुधवारी शिताफीने पकडले आहे. या महिलेच्या ताब्यातून पोलिसांनी एक लाख १६ हजार रूपयांची एम. डी. पावडर (एम. डी.) जप्त केली आहे. फिजा मनोज इराणी (२९, रा. पाटीलनगर, इराणी वस्ती, आंबिवली) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. तस्करी, सरकारी कामात अडथळा आणि अनेक गुन्हेप्रकरणी या महिलेवर कोळसेवाडी, खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

# नायडोंगरी कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९०/५८ टक्के

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------

उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी /मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या १२ वी परीक्षेचा निकाल घोषित झाला असून लोकनेते कै अँड विजय शिवराम आहेर हायस्कूल व जुनिअर कॉलेज नायडोंगरी विद्यालयाचा निकाल ९०/५८ टक्केलागला.

नायडोंगरी कनिष्ठ महाविद्यालयात एकूण १७० विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते पैकी ५ विद्यार्थी विशेष योग्यतेसह तर ३५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले विद्यालयाचे एकूण १५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले

कनिष्ठ महाविद्यालयातील प्रथम पाच यशाचे मानकरी

१) अशोक लक्ष्मण चव्हाण ७६/५३
२) अक्सा नजीम तांबोळी ७३/३३
३) हर्षला विनोद साबळे ७२/५०
४) जेजुरकर आकांक्षा बापूसाहेब ७०/३३
५) जानराव आशा जितेंद्र ७०/१७

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सरचिटणीस विलासराव आहेर यांनी अभिनंदन केले आहे. विद्यालयाच्या प्राचार्या पल्लवी आहेर, उपमुख्याध्यापक रत्नमाला सोनगीरे, पर्यवेक्षक तानाजी मवाळ व संस्थेचे संचालक तथा मुख्य लिपिक बाळासाहेब भोसले यांनी अभिनंदन केले आहे तसेच विद्यालयाच्या सर्व शिक्षकवृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व सेवक वर्गाने अभिनंदन केले आहे

# राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघाचा प्रथम वर्धापन दिन संपूर्ण देशभरात वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून होणार साजरा -- राष्ट्रीय अध्यक्ष : गणेश कचकलवार

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------



अल्पावधीतच महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशभरात युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या माध्यमातून हजारो पत्रकारांची टीम बनवून त्यांना एकत्र आणून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी देश पातळीवर अत्यंत वेगाने पसरत असलेली देशव्यापी संघटना म्हणजे युवा ग्रामीण पत्रकार संघाची ओळख आहे.याच युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचा ५ जूनला प्रथम वर्धापन दिन संपूर्ण देशभरातून वेगवेगळ्या राज्यात सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून साजरा केला जाणार आहे. आरोग्य तपासणी शिबिर, रक्तदान शिबिर, ग्रामीण तसेच शहरी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,शाळकरी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, सामाजिक, राजकीय स्कृतीक, शैक्षणिक, अध्यात्मिक, वैद्यकीय, कृषी तसेच प्रत्येक क्षेत्रातील नाविन्यपूर्ण काम करणाऱ्यांचा सत्कार व पत्रकारांना सन्मान या वर्धापन दिनी संघटनेच्या माध्यमातून देशभरात होणार आहे. सध्या देशभरातील महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, हिमाचल प्रदेश, पंजाब, दिल्ली, कर्नाटका, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगाना, आसाम, गुजरात, राजस्थान, हरियाणा इत्यादी राज्यात युवा ग्रामीण पत्रकार संघ कार्यरत आहे २०२५ हे वर्ष संपण्याआधी संपूर्ण भारतभर म्हणजेच भारतातील संपूर्ण राज्यामध्ये युवा ग्रामीण पत्रकार संघ असल्याचे आपणास पहावयास मिळेल असे आश्वासन राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी दिली आहे. समाजातील प्रत्येक घटकांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असलेले युवा ग्रामीण पत्रकार संघ खरोखरच त्यांच्या माध्यमातून संपूर्ण देशभरातून पत्रकारांबरोबरच गोरगरीब जनतेला न्याय देण्याचे काम करत आहे, त्यामुळे संपूर्ण देशभरातून हजारोच्या संख्येने पत्रकार बांधव संघटनेस जुळत आहे. महाराष्ट्रामध्ये तर तालुका व जिल्हानिहाय जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करून त्यांच्या माध्यमातून पत्रकारांच्या समस्या सोडवून, गोरगरीब जनतेला न्याय देण्याचं काम युवा ग्रामीण पत्रकार संघ करत आहे.आपली कुणाशीही स्पर्धा नसून आपले ध्येय,उद्दिष्ट समोर ठेवून काम करत राहावे असे आवाहन राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या सर्व सदस्य व पदाधिकाऱ्यांना दिले.

# गोव्यातील लैराईदेवी उत्सवादरम्यान झालेली चेंगराचेंगरी अत्यंत दु:खद

लैराईदेवी यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी गोवा, महाराष्ट्र आणि कर्नाटक येथुन दरवर्षी ७० ते ८० हजार भाविक याठिकाणी पोहचत असतात.परंतु दिनांक ३ मे २०२५ शनिवारला गोव्याच्या उत्तर भागात असलेले शिरगांव येथील श्री लैराईदेवी मंदिरात पहाटे ३ ते ४ च्या दरम्यान भाविकांमध्ये अचानक चेंगराचेंगरीची घटना घडली यात ६ लोकांचा मृत्यू झाला असून ५ जण व्हेंटिलेटरवर आहेत व ८० पेक्षा अधिक घायल असल्याचे सांगितले जाते.वार्षिक उत्साहासाठी हजारो भाविक अरूंद गल्ल्यांमधुन मंदिरात येत असतांना ही भयावह घटना घडली.मंदिरातील उत्सवासाठी किमान ३० ते ४० हजार भाविक एकत्र जमले होते.यातील काही जण उतार असल्याने खाली पडले.त्यामुळे इतरही लोक एकमेकांच्या अंगावर कोसळल्याने भयावह चेंगराचेंगरीचा घटना झाली.दरवर्षी कुठे ना कुठे चेंगराचेंगरीच्या घटनांचा प्रकार दिसून येतो. यामुळे जीवितहानी सुध्दा होते.त्याची पुनरावृत्ती आपल्याला गोव्याच्या शिरगांव येथील लैराईदेवी मंदिराजवळ दिसून आली.अशाच प्रकारची घटना आंध्रप्रदेशातील प्रसिद्ध तिरूपती बालाजी मंदिराजवळ वैकुंठ व्दार दर्शनाच्या टोकन वितरण केंद्रावर झालेल्या चेंगराचेंगरीत दिनांक ८ जानेवारी २०२५ ला ६ जणांचा मृत्यू झाला होता व ४० हुन अधिक गंभीर जखमी झाले होते.टोकन वितरण केंद्र सकाळी ५ वाजता उघडण्याचे नियोजन होते.यासाठी भाविक रांगा लावू लागले व प्रचंड गर्दी झाली होती.विविध केंद्रावर सुमारे ४००० हजारहून अधिक भाविक रांगेत उभे होते व चेंगराचेंगरीमुळे मोठा गोंधळ उडाला आणि त्यात एका महिलेचा प्रथम मृत्यू झाला व नंतर गंभीर जखमी झालेल्या ५ भाविकांचा मृत्यू झाला अशाप्रकारे ६ भाविकांना चेंगराचेंगरीत आपले प्राण गमवावे लागले.देशात दरवर्षी अनेक ठिकाणी मंदिर परिसर, प्रवचन परिसर, किर्तन परिसर, गर्दीचे ठिकाण,रेल्वे स्टेशन किंवा अन्य ठिकाणी चेंगराचेंगरीचे प्रकार होतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी सुध्दा झालेली आहे आणि याचे जिवंत उदाहरण आपल्याला गोव्यातील लैराईदेवी मंदिर परिसरात दिसून आले. चेंगराचेंगरीचे प्रकार का होतात याला मुख्य जबाबदार कोण याचाही विचार आपण सर्वसामान्यांनी, मंदिर प्रशासनाने व स्थानिक प्रशासनाने केला पाहिजे.कारण भाविकांनी भीड करायची व मंदिर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करायचे त्याचे प्रायचित्य भाविकांनी भोगायचे अशी परिस्थिती आज चेंगराचेंगरीच्या प्रकारात दिसून येते म्हणजेच "आ बैल मुझे मुझे मार" अशी परिस्थिती झालेली आहे.भारतातील चेंगराचेंगरीच्या अनेक भयावह घटना झालेल्या आहेत यामध्ये ५ मार्च २०१० ला उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला.भारतात बऱ्याच ठिकाणी अपुऱ्या आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादांमुळे असुरक्षितता असते. अनेकदा दुर्गम ग्रामीण भागात, डोंगराळ प्रदेशात, टेकड्यांवर किंवा योग्य मार्ग नसलेल्या नदीकाठावर धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केले जाते. अशा ठिकाणी असलेला तीव्र उतार, स्थळाची असमान भूरचना,अरुंद मार्ग, एकाच ठिकाणी भाविक एकत्रित येणे या कारणांमुळे धार्मिक कार्यक्रमामध्ये मोठे धोके निर्माण होतात. त्यातून चेंगराचेंगरीच्या घटना घडतात.धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रम घेताना व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करते व दुर्घटना उद्भवतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शनं (आयजेडीआरआर)ने प्रकाशित केलेल्या २०१३ च्या अभ्यासात असं दिसून आलं की, भारतातील ७९ टक्के चेंगराचेंगरीचे ठिकाण हे धार्मिक मेळावे आणि तीर्थयात्रेची ठिकाणे आहेत. विकसित देशांमध्ये बहुतेक चेंगराचेंगरी स्टेडियम, संगीत मैफिली आणि नाईट क्लबच्या ठिकाणी होतात. परंतु भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये चेंगराचेंगरीच्या बहुतेक दुर्घटना धार्मिक स्थळांवर होतात,असे केरळ सरकारच्या भू आणि आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे सहाय्यक प्राध्यापक फैसल टी. इलियास यांनी सांगितले. ४ जुलै २०२४ उत्तर प्रदेशातील हाथरस येथे एका धार्मिक कार्यक्रमात चेंगराचेंगरी होऊन किमान २७ जणांचा मृत्यू झाला,१७ फेब्रुवारी २०२४ उत्तर प्रदेशातील मथुरा येथील पूजनीय श्रीजी मंदिरात होळीपूर्वी झालेल्या कार्यक्रमादरम्यान चेंगराचेंगरीत किमान सहा भाविक बेशुद्ध पडले तर काही जण जखमी झाले,२४ डिसेंबर २०२३ मथुरा येथील बांके बिहारी मंदिरात गर्दीमुळे गुदमरून दोन महिला भाविकांचा मृत्यू झाला,१ जानेवारी २०२२ जम्मू आणि काश्मीरमधील प्रसिद्ध माता वैष्णोदेवी मंदिरात भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीत १२ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले,२१ एप्रिल २०१९ तामिळनाडूच्या त्रिची येथील मंदिर उत्सवात चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला, १० ऑगस्ट २०१५ झारखंडमधील देवघर शहरातील एका मंदिरात चेंगराचेंगरीत किमान ११ जणांचा मृत्यू आणि ५० जण जखमी झाले, १४ सप्टेंबर २०१४ आंध्र प्रदेशातील राजमुंद्री येथे 'पुष्करम' उत्सवाच्या उद्घाटनाच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी जमली होती गोदावरी नदीच्या काठावरील एका प्रमुख स्नानस्थळावर चेंगराचेंगरीत २७ यात्रेकरूंचा मृत्यू आणि २० जण जखमी झाले,२५ ऑगस्ट २०२४ ला मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यातील एका मंदिरात अफवेमुळे चेंगराचेंगरी झाल्यानं दहा यात्रेकरू ठार आणि २० हून अधिक जखमी झाले,१३ऑक्टोबर २०१३ मध्यप्रदेशातील दातिया येथील रतनगढ मंदिराजवळ चेंगराचेंगरीत ८९ जणांचा मृत्यू आणि १०० हून अधिक जखमी झाले, १४जानेवारी २०११ केरळमधील सबरीमाला मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत १०६ यात्रेकरू ठार तर १०० हून अधिक जखमी झाले,४ मार्च २०१० उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला, ३०सप्टेंबर २००८ राजस्थानमधील जोधपूरमधील मेहरानगड किल्ल्याच्या परिसरात असलेल्या चामुंडा देवी मंदिरात चेंगराचेंगरीत २४४ लोकांचा गुदमरून मृत्यू झाला,३ ऑगस्ट २००६ हिमाचल प्रदेशातील नैना देवी मंदिरात चेंगराचेंगरीत सुमारे १५० भाविकांचा मृत्यू आणि ४०० हून अधिक जखमी झाले,२६ जानेवारी २००५ ला पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील वाई जवळील मंदेर देवी मंदिरात वायरिंगमध्ये शॉर्ट सर्किटमुळे ठिणग्या निघाल्यानं घाबरलेल्या हजारो भाविकांनी गर्दी केली होती. मंदिराकडे जाणाऱ्या अरुंद मार्गावर गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी झाली व लोक एकमेकांवर पडल्याने २९१ जणांचा मृत्यू झाला तर २०० हून अधिक जण जखमी झाले,२७ ऑगस्ट २००३ नाशिक कुंभातील पवित्र स्नानादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ३९ जणांचा मृत्यू झाला तर १४०जण जखमी झाले.चेंगराचेंगरीच्या भयावह घटना पहाता त्या टाळण्यासाठी मंदिर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनी किंवा भाविकांनी गर्दीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याठिकाणी आपण जावे की नाही याचा गंभीरतेने विचार करूनच गेले पाहिजे. मंदिर परिसरातील वाढत्या चेंगराचेंगरीच्या घटना पहाता मंदिर प्रशासनावर राज्य सरकारने व केंद्र सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व त्यांच्या चुका उघड करून कारवाई करून त्यात सुधारणा करण्याची आज गरज आहे.देशातील संपूर्ण मंदिरे हे भारतीय संस्कृतीचे आस्थेचे प्रतिक आहे आणि मंदिर प्रशासन व सरकार यांच्यात तालमेल व्यवस्थित असला चेंगराचेंगरीच्या भयावह घटना सहज टाळता येतात.अशाप्रकारे वरील भयावह घटना टाळण्यासाठी भाविक,मंदिर प्रशासन, स्थानिक प्रशासन,राज्य सरकार व केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित केले पाहिजे व अशा घटनांच्या बाबतीत सतर्कता बाळगली पाहिजे.कारण या दुर्घटना आपण सहज टाळु शकतो.याकरीता सर्वांनीच"जान है तो जहान है" हा मुलमंत्र अंगीकारला हवा आणि अशा गंभीर दुर्घटनांवर अंकुश लावला पाहिजे.

---

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर.

# जी एस महानगर बँकेची रणधुमाळी

## संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके व श्रीमती सुमन गुलाबराव शेळके पॅनल " जाहीर

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

जी एस महानगर बँकेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक जाहीर झाली असून बँकेच्या अध्यक्षा श्रीमती सुमनताई गुलाबराव शेळके यांच्या नेतृत्वाखाली "संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके व श्रीमती सुमन गुलाबराव शेळके " पॅनल " उभा करण्यात आला आहे , अशी माहिती बँकेच्या अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांनी दिली आहे .जी एस महानगर



बँकेचा १९७३ साली सुरू झालेला हा प्रवास एका छोट्याशा ९ बाय १८ चौरस फूट खोलीतून झाला , परंतु ही केवळ बँकेची कहाणी नाही, ही आहे एका स्वप्नाची कथा, जी माझे पती सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब आणि त्यांचे सहकारी यांनी प्रत्यक्षात आणली. आज जी एस महानगर बँक संपूर्ण महाराष्ट्रभर विस्तारली आहे . बँकेचे ८० हजार ४१० भागधारकांचा बँकेवर ठाम विश्वास असून ६८ कोटी ६१ भाग भांडवल आहे . २ हजार ८८४ कोटींची भक्कम ठेव असून राज्यभर ७० शाखांचा विस्तार झालेला आहे .जी एस महानगर बँकेचे हे यश विश्वासाचं, जिद्दीचं आणि सामूहिक प्रगतीचं प्रतीक आहे. "आपली बँक ही , फक्त बँक नाही, तर लोकांसाठी, लोकांनी उभी केलेली चळवळ आहे . जी एस महानगर बँकेच्या भवितव्यासाठी , दिवंगत गुलाबराव शेळके व ॲड उदय शेळके यांच्या स्वप्नांची पुर्ती म्हणजे त्यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली च होय , " संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके व श्रीमती सुमन गुलाबराव शेळके " पॅनलच्या विचारांना पाठिंबा द्यावा , जीएस महानगर बँकेचे सर्व ग्राहक , हितचिंतक आणि ठेवीदारांमुळे हे शक्य झाले आहे , त्यामुळे मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानत असल्याचे , मत , बँकेच्या अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांनी व्यक्त केले आहे .

# नांदगाव तालुक्यातील पिंपरी हवेली येथील योगेश वाघ यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांचा शिवसेना पक्षात प्रवेश

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

नांदगाव तालुक्यातील पिंपरी हवेली येथील सोसायटीचे माजी चेअरमन शिवाजी दामू वाघ बाळासाहेब वाघ पिंटू गांगुर्डे संजय मोरे तसेच प्रतिष्ठित कापूस व्यापारी योगेश वाघ यांनी आ. सुहास कांदे यांच्या उपस्थितीत पिंपरी हवेली येथे झालेल्या कार्यक्रमात शिवसेना पक्षात जाहिर प्रवेश केला. यावेळी बोलताना योगेश वाघ यांनी आम्ही पक्षात नव्हतो तेव्हाही आमच्या मनात अण्णाच होते आणि म्हणूनच अण्णांचा विकास कामांचा १८० चा स्पीड पाहून आम्ही सर्वांनी अधिकृत शिवसेना पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. आ. सुहास कांदे यांनी यावेळी बोलताना पक्षात



प्रवेश करणाऱ्या सर्व शिवसैनिकांचे स्वागत केले तसेच आपणास योग्य तो मानपान सन्मान दिला जाईल आपल्या सूचनांचे पालन केले जाईल व आपल्या प्रत्येक अडचणींमध्ये खंबीरपणे पाठीशी उभा राहील असा विश्वास दिला. कार्यक्रमाला उशीर झाल्या नंतरही मोठ्या संख्येने पूर्ण गाव या कार्यक्रमास उपस्थित असल्याचा आनंद व्यक्त करून दाखवला. यावेळी परधाडी गावातील पहिली विधी तज्ञ ठरलेली कुमारी नयना बाळासाहेब वाघ हिचा पुष्पगुच्छ व शाल देत सौ अंजुमताई कांदे यांनी सत्कार केला. यावेळी राज्यमंत्री दर्जा मिळाल्याबद्दल ग्रामस्थ व पक्ष प्रवेश करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांनी आ. सुहास कांदे यांचा सत्कार केला. त्याप्रसंगी सौ.अंजुमताई कांदे , विलास भाऊ आहेर ' अनिल वाघ ' साईनाथ गिडगे ' यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी रेखा शिवाजी वाघ, सोनाली योगेश वाघ, लक्ष्मीबाई बाळासाहेब वाघ, कमलाबाई परदेशि ,माया नाना कदम ,आदी सह वि. का सो.सा माजी चेअरमन दिनकर आनंदा पाटील, सुदाम बापुराव वाघ,सुदाम वामन वाघ, नामदेव श्यामराव पाटील , राकेशसिंग परदेशि, बापुशेठ रामचंद्र कासार , दादासाहेब राजाराम वाघ , छगन एकनाथ वाघ, प्रविण पाटील , नानासाहेब पटाईत , सुनिल दौलत वाघ, योगेश सोनवणे,विजय देवराम पाटील, समाधान निंबा वाघ, विलास मोरे, गोरख महारू शेळके, छोटुसिंग रामसिंग गायकवाड , शरद हंसराज चव्हाण, रमेश भिका मोरे बाबुलाल भिका सोनवणे, , गोरख धर्मा राठोड , मोहन सरीचंद चव्हाण, रामलाल पांगु राठोड, पांडु बाळनोथ ,अंबादास शेजवळ ,रतन मानसिंग चव्हाण विशाल ज्ञानेश्वर राठोड. उपस्थित होते.

# जातीनिहाय जनगणनेत समाजाने पोटजाती ऐवजी धनगर जातीचाच उल्लेख करावा

## जळगाव येथील धनगर समाज महासंघाच्या राज्यव्यापी बैठकीत एकमुखी ठराव संमत

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

केंद्र सरकार लवकरच जातीनिहाय जनगणना करणार आहे. त्यात पोट जातीचा उल्लेख न करता केवळ धनगर जातीचाच उल्लेख करावा यासह अन्य ठराव महाराष्ट्र धनगर समाज महासंघाच्या प्रदेश कार्यकारीणी व सर्व आघाड्यांचे प्रमुख, जिल्हा अध्यक्ष यांच्या उपस्थितीत झालेल्या राज्यव्यापी बैठकीत एकमतांनी मंजूर करण्यात आले. महाराष्ट्र धनगर समाज महासंघाच्या वतीने जळगाव, निमखेडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्मारकात झालेल्या राज्यव्यापी बैठकीत हे ठराव करण्यात आले. प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन माजी आमदार मा. ॲड. रामहरी रुपनवर, महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मा. ॲड. राजेंद्र ऊर्फ चिमणभाऊ डांगे, माजी अध्यक्ष श्रीरामभाऊ पुंडे, मल्हार सेनेचे सरसेनापती बापू बबनराव रानगे, प्रदेश सरचिटणीस सुनिल बापू वाघ, अहिल्या महिला संघाच्या प्रदेशाध्यक्षा डॉ. अलकाताई गोडे, महामंत्री श्री. सुभाषभाऊ सोनवणे, कर्मचारी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रा. अंकुशराव निर्मळ या मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. धनगर





समाज महासंघाच्या राज्यव्यापी बैठकित पुढील प्रमाणे ठराव मांडण्यात आले केंद्र सरकार लवकरच जातीनिहाय जनगणना करणार आहे त्यात पोट जातीचा उल्लेख न करता केवळ धनगर जातीचाच उल्लेख करावा या संदर्भात समाजाचे प्रबोधन करण्यावर भर देणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती ३१ मे व पुण्यतिथी १३ ऑगस्ट या कालावधीत गाव, तालुका, जिल्हाभर त्रिशताब्दी जन्मोत्सव साजरा करणे, महाराष्ट्र धनगर समाज महासंघाच्या वतीने संघटनात्मक बदल करून जिल्हानिहाय संघटनात्मक बांधणीची जबाबदारी राज्य पदाधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आली. जळगाव शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी राज्यसरकारने ५ कोटी रुपयाचा निधी पर्यटन विकास मंत्रालया मार्फत दिल्याबद्दल महाराष्ट्राचे मंत्री मा. ना. गिरीशजी महाजन, अरविंद देशमुख, सुभाषभाऊ सोनवणे यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. यावेळी माजी आमदार मा. ॲड. रामहरी रुपनवर बोलताना म्हणाले कि, धनगर समाजातील सर्वांनी एकीने राहिले पाहिजे, आपल्या हक्कासाठी संघर्षाची तयारी ठेवली पाहिजे, वर्षातून किमान दोन वेळ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव असलेल्या चौंडीस दर्शनासाठी आले पाहिजे, अहिल्यादेवी यांचे कार्य व इतिहास राज्यभर पोहोचविला पाहिजे, याठिकाणी धनगर समाजाचे जेष्ठ नेते, चौंडी विकासाचे शिल्पकार, मा. डॉ. अण्णासाहेब डांगे यांच्या कल्पक दृष्टीकोनातून उभारण्यात आलेली भव्य शिल्प सृष्टी व निरनिराळ्या विकासाच्या योजना पाहिल्या पाहिजेत. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मा. ॲड. राजेंद्र ऊर्फ चिमणभाऊ डांगे म्हणाले कि, महाराष्ट्र धनगर समाज महासंघ या आपल्या महासंघाचे महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात संघटन आहे. हे संघटन अधिक प्रमाणात मजबूत व भक्कम करण्यासाठी प्रदेश, जिल्हा व तालुक्यातील पदाधिकारी व समाज बांधव यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. यावेळी महासंघाचे माजी अध्यक्ष श्रीरामभाऊ पुंडे, प्रदेश सरचिटणीस श्री. सुनिलभाऊ वाघ, मल्हार सेनेचे सरसेनापती श्र. बबनराव रानगे, अहिल्या महिला संघाच्या प्रदेशाध्यक्षा डॉ. अलकाताई गोडे, कर्मचारी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रा. अंकुशराव निर्मळ यांनी आपली मनोगते व्यक्त केली. स्वागत व प्रास्ताविक महासंघाचे महामंत्री श्री. सुभाषभाऊ सोनवणे यांनी केले. शेवटी आभार अहिल्या महिला संघाच्या वसुंधराताई लांडगे यांनी मानले, बैठकीचे उत्तम संयोजन प्रभाकर न्हाळदे, रेखाताई न्हाळदे, विष्णू ठाकरे, मंजुषा सुर्यवंशी, सुभाष करे, रामचंद्र चहिट, दिलिप धनगर, संदीप मनोरे, गणेश बागुल यांनी केले. राज्यव्यापी बैठकीस राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील महासंघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# PASSWORD PROTECTED PAGE